भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# -: ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प :-

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

## कालावधी (दिनांक १८.०९.२०१९ ते २२.०९.२०१९)

| अंक ७५/२०१९ | दिनांक १७.०९.२०१९ | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (११/०९/२०१९ ते १७/०८/२०१९ पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानुमान (वैधता १८/०९/२०१९ ते २२/०९/२०१९ पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११/०९ | १२/०९ | १३/०९ | १४/०९ | १५/०९ | १६/०९ | १७/०९ | दिनांक | १८/०८ | १९/०९ | २०/०९ | २१/०९ | २२/०९ |
| ६.६ | ३.२ | ११.८ | ५.२ | १२.८ | ३४.६ | ३९.० | पाऊस (मि. मी) | ५ | १० | १२ | ३२ | ११ |
| ३०.५ | ३०.५ | ३०.० | ३०.० | ३१.० | ३१.० | २८.० | कमाल तापमान (अं. से) | २९ | ३१ | ३० | ३० | ३२ |
| २३.० | २४.० | २४.५ | २४.० | २४.० | २३.० | २३.५ | किमान तापमान (अं. से) | २३ | २३ | २३ | २३ | २४ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | निरभ्र | सकाळ - मेघाच्छादन (ऑक्टा.) | ६ | ८ | ७ | ६ | ७ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | दुपार | | | | | |
| ९२ | ९२ | ९५ | ९५ | ९६ | ९३ | ९५ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९६ | ९६ | ९७ | ९६ | ९६ |
| ७८ | ७८ | ७७ | ७८ | ६६ | ९० | ६७ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ७१ | ६८ | ७९ | ७३ | ७१ |
| १.० | १.३ | ०.७ | १.३ | ०.९ | ०.८ | ०.१ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ००३ | ००४ | ००५ | ००५ | ००४ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ - वा-याची दिशा | आग्नेये कडून | दक्षिणे कडून | आग्नेये कडून | दक्षिणे कडून | आग्नेये कडून |
| पश्चिमे | पश्चिमे | पश्चिमे | पश्चिमे | पश्चिमे | स्थिर | दक्षिणे | दुपार | | | | | |

| मागील वर्षातील (२०१८) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ३२६९.२ | ४११२.७ | ४११२.७ | ११३.२ |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** येत्या ५ दिवसात जिल्हयात मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | फुलोरा | जिल्ह्यात सततच्या पावसामुळे भातावर पाने गुंडाळणारी अळी या किडीचा प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी २५% प्रवाही क्विनॉलफॉस १८ मि.ली. किंवा ट्रायझोफॉस ४०% प्रवाही १३ मि.ली. प्रती १० लि. पाण्यामध्ये मिसळून पाऊसाची उघडीप पाहुन फवारावे. काही ठिकाणी भातावर निळे भुंगेरे या किडीचा प्रादुर्भाव आढळुन आला असुन निळे भुंगेरे या किडीच्या नियंत्रणासाठी २५% प्रवाही क्विनॉलफॉस ४० मिली किंवा ट्रायझोफॉस ४०% प्रवाही १२.५ मिली लॅमडासायहॅलोथ्रिन ५% प्रवाही ५ मिलि प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळुन पावसाची उघडीप पाहुन फवारावे. |
| भुईमुग | फुलोरा | भुईमुग पिक काही ठिकाणी फुलोरा अवस्थेत असुन हळव्या जाती आरा अवस्थेत आहेत. तरी भुईमुगाच्या पिकावरुन रिकामे पिंप फिरवल्याने जमिनीत घुसणा-या आ-यांची परिणामतः शेंगांची संख्या वाढल्याने भुईमुगाचे उत्पन्न वाढते. |
| आंबा | - | आंब्यावर फांदेमर रोगाचा प्रादुर्भाव दिसुन आल्यास नियंत्रणासाठी कॉपर ऑक्सीक्लोराइड ०.३% (३० ग्रम/१० ली. पाणी) किंवा ०.१% बोर्डो मिश्रण यापैकी एका बुरशीनाशकाची पावसाची उघडीप पाहुन फवारणी करावी. फांदेमर रोगाने मोठ्या फांद्यामधुन डिंक येत असल्यास रोगग्रस्त साल तासुन त्याठिकाणी बोर्डो मिश्रणाची पेस्ट किंवा कॉपर ऑक्सीक्लोराइडची पेस्ट लावावी.<br>आंब्यामध्ये रोगट व सुकलेल्या फांद्या, बांडगुळे कापुन घ्यावीत व त्या ठिकाणी १% बोर्डो मिश्रण लावावे.<br>पॅक्लोब्युट्रॉझॉल (कल्टार) दिलेल्या झाडांचे बुंधे व त्याभोवतालचा भाग बेणणी करुन अथवा ग्रामोक्झोन हे तणनाशक फवारुन तणविरहीत ठेवावेत. |
| काजु | - | सततच्या व अति पावसामुळे काजु पिकावर अचानक पानगळ/पानकुज आणि फांद्या वाळण्याची समस्या निर्माण झाली आहे.<br>रोगग्रस्त बागेतील रोगामुळे गळुन पडलेली पाने बागेपासुन दुर अंतरावर खोल खड्ड्यात गाडुन टाकावीत. त्याचबरोबर रोगाने बाधित झालेल्या फांद्या कापुन काढाव्यात व त्यावर त्वरीत बोर्डोपेस्टचा लेउ द्यावा.<br>पानगळ/पानकुज रोग नियंत्रणासाठी मेटॅलॅक्झील ८%+मॅन्कोझेब ६४% हे बुरशीनाशक १० लिटर पाण्यात २० ग्रॅम या प्रमाणात मिसळुन फवारणी करावी. |
| नारळ व सुपारी | फुलोरा | नारळ व सुपारीवरील फळगळ या रोगाच्या नियंत्रणासाठी १% बोर्डोमिश्रनाची फवारणी करावी. |
| केळी | निसवणि | केळीवर मावा किडीचा प्रादुर्भाव आढळल्यास डायमिथोएट १५ मिली प्रती १० लि. पाण्यातून १५ दिवसांच्या अंतराने ३ वेळा फवारावे. |
| भाजीपाला | फळधारणा | नवीन वेलींचे पाने खाणारी अळी, मावा इ. कीडींपासून संरक्षण करावे.वेलींचे पाने खाणारी अळी, मावा इ. कीडींपासून संरक्षण करण्यासाठी मॅलॅथिऑन २ मि.ली. किंवा डायमिथोएट १.५ मि.ली. प्रती लीटर पाण्यात मिसळुन १०-१५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. |
| दुभती जनावरे, शेळ्या व कुक्कुटपालन | - | पशुवैद्यकाच्या मार्गदर्शनाखाली गाई व म्हशींना पायलाग रोग प्रतिबंधक लसीकरण करुन घ्यावे.<br>पशुवैद्यकाच्या मार्गदर्शनाखाली शेळ्यांना पी.पी. आर (माथा) रोग प्रतिबंधक लसीकरण करुन घ्यावे. कोंबड्यांचे उन्हापासून संरक्षण करावे. |
| मस्त्यपालन | | शोभिवंत मस्त्यपालन करणा-या शेतक-यांनी बीर निर्मिती व विरळणी कार्यक्रम चालु ठेवावा. बोटुकली आकाराचे मस्त्यबीर प्राप्त झाल्यानंतर त्यांची साठवणुक १००० नग प्रति हेक्टरी यापमाणात संवर्धन तळ्यात करावी व बीजाच्या वजनाच्या ८ ते १० टक्के एवढे कृत्रीम खादय रोज दोनवेळा विभागुन दयावे. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग | डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता/नोडल ओफिसर<br>(ग्रामिण कृषि मौसम सेवा)<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>(०२३६२-२४४२३१) | डॉ. यशवंत चं. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>(०२३६२-२४४२३१) |
|---|---|---|